# पिंपरी चिंचवड महानगरपालिका ,
## पिंपरी ४११०१८.
### जाहिरात क्रमांक - १४५५ /२०२२

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अस्थायी आस्थापनेवर मा.महाराष्ट्र शासनाच्या मान्यतेच्या अधिन राहून खालीलप्रमाणे नमूद पद फक्त ११ महिने कालावधीकरीता दरमहा एकत्रित मानधनावर भरण्याकरीता दि. २१/०३/२०२२ पर्यंत मा.आयुक्त,पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचे नावे अर्ज मागविणेत येत आहेत. या विषयाची सविस्तर जाहिरात www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

| अ.क्र. | पदनाम | पदसंख्या |
|---|---|---|
| १ | सल्लागार | १ |

वरील पदाकरीता, आवश्यक असणारी शैक्षणिक अर्हता, वयोमर्यादा,अनुभव तसेच नियुक्तीच्या अटी व शर्ती, मानधन यांचा तपशील जाहिरातीमध्ये सविस्तर नमूद करण्यात आला आहे.

तरी इच्छुक पात्र उमेदवारांनी आपले अर्ज जाहिरातीत नमूद केलेल्या कालमर्यादेमध्ये सादर करावेत.

सही/-
(राजेश पाटील)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८

क्रमांक प्रशा/१/कावि/११२/२०२२
दिनांक १६/०३/२०२२

(बाळासाहेब खांडेकर)
सहाय्यक आयुक्त,प्रशासन
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११०१८
## प्रशासन विभाग
## जाहिरात क्रमांक - १४५५/२०२२

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अस्थायी आस्थापनेवर खालीलप्रमाणे नमूद केलेले पद करार पध्दतीने दरमहा एकत्रित मानधनावर फक्त ११ महिने कालावधीकरीता तात्पुरत्या स्वरुपात भरावयाचे आहे. त्याकरीता पात्र उमेदवारांकडून समक्ष मा.आयुक्त,पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचे नावे अर्ज मागविण्यात येत आहेत.

अर्जामध्ये चुकीची अथवा खोटी माहिती सादर करणा-या उमेदवारांना निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र ठरविणेत येईल.

**१.पदनाम, पदसंख्या व आरक्षण :-**

| अ.क्र. | पदनाम | पदसंख्या | प्रवर्ग |
|---|---|---|---|
| १ | सल्लागार | १ | खुला |

वरील प्रवर्गनिहाय पदसंख्या व आरक्षण यामध्ये बदल होण्याची शक्यता असून त्याबाबतचे सर्व अधिकार मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना राहतील.

**२. वयोमर्यादा :-**

उपरोक्त पदासाठी फक्त सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता,स्थापत्य पदावरील उमेदवारांसाठी ६५ वर्षापर्यंत वयाची अट शिथिल राहील.

**३. शैक्षणीक व अनुभवाची अर्हता :-**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यकारी अभियंता(स्थापत्य) पदावर काम केलेले व पाणीपुरवठा विभागात सलग ०५ वर्ष कामाचा अनुभव असलेले अधिकारी

**४. मानधन-** महाराष्ट्र शासन,सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२७१५/ प्र.क्र. १००/१३ दिनांक १७ डिसेबर, २०१६ मधील तरतुदीनुसार मानधन (मासीक पारिश्रमिक) देय राहील.

**५. अटी व शर्ती**

५.१ पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडील कार्यरत असलेले प्रकल्पासाठी सल्लागार पद करार पध्दतीने, मानधनावर भरावयाचे आहे.

५.२ करार पध्दतीने मानधनावरील नेमणुक फक्त ११ महिने कालावधीसाठी तात्पुरत्या हंगामी स्वरुपाची तसेच मा.महाराष्ट्र शासनाच्या मान्यतेच्या अधीन आहे.

५.३ करार पध्दतीने नियुक्ती फक्त अकरा महिने कालावधीसाठी देण्यात आल्यामुळे संबंधितांस महानगरपालिकेच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाबाबत किंवा सामावून घेण्याबाबत व नियमित सेवेचा इतर कोणताही लाभ मिळण्याचा अधिकार नसेल, तसेच अकरा महिने नेमूणक कालावधी पूर्ण झाल्यानंतर पुन:श्च नेमणूक मिळणार नाही या सर्व बाबीचे अर्जदाराने र.रु. १००/- च्या स्टॅम्पपेपरवर हमीपत्र देण्यात यावे.

५.४ विहीत मुदतीत अर्ज केलेल्या उमेदवारांची मौखिक मुलाखत घेण्यात येईल.

५.५ अर्जासोबत सादर केलेला अनुभवाचा दाखला खोटा असल्याचे निदर्शनास आल्यास तो अनुभव ग्राह्य धरला जाणार नाही, संबंधित उमेदवार अपात्र ठरविण्यात येईल.

५.६ उमेदवारांनी कागदपत्रे तपासणीसाठी उपस्थित राहताना शैक्षणिक अर्हता, जातीचे प्रमाणपत्र व अनुभवाबाबतच्या कागदपत्रांच्या आवश्यक त्या मुळ प्रती व साक्षांकित केलेल्या सत्य प्रती उदा. गुणपत्रिका (मार्कशीट) प्रमाणपत्र, अनुभव प्रमाणपत्र व इतर कागदपत्रे सादर करणे बंधनकारक आहे.

५.७ निवड केलेल्या उमेदवारांस मनपाने ठरवून दिलेल्या अटी शर्तीनुसार कामकाज करणे बंधनकारक राहिल. काम करणेस नकार दिलेस कोणतीही पूर्वसूचना न देता मानधनावरील नेमणूक रद्द करण्यात येईल.

५.८ उमेदवारांना कार्यालयीन कामकाजाच्या वेळा पाळणे बंधनकारक राहील. त्यामध्ये कोणतीही सवलत अनुज्ञेय नाही.

५.९ उमेदवारांची नेमणूक झालेनंतर बायोमेट्रीक पध्दतीने हजेरी नोंदविणे बंधनकारक राहील व हजेरी मस्टरवर रोजचे रोज स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. त्याशिवाय मानधन अदा केले जाणार नाही.

५.१० नियुक्ती प्राधिकारी म्हणून मा. आयुक्त यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचा अधिकार राहील.

५.११ करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदाराचे नेमून दिलेले काम समाधानकारक नसल्यास कोणतेही सबळ कारण न देता त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.

५.१२ करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदाराने नियुक्तीच्या ठिकाणी नियुक्ती आदेश निर्गमित झालेल्या दिनांकापासून आठ दिवसाच्या आत रुजू होणे बंधनकारक राहील अन्यथा सदर नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल.

५.१३ करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीने सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल अशा व्यावसायिक कामात गुंतलेली नसावी तसेच त्यांना प्राप्त होणारी कागदपत्रे/ माहिती व आधारसामुग्री बाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहिल.

५.१४ निवड झालेल्या उमेदवारांस एकत्रित मानधनाव्यतिरिक्त अन्य कोणत्याही सोयी सुविधा, हक्क व इतर आर्थिक लाभ देय राहणार नाही.

५.१५ अर्जदाराने अर्ज केला अथवा विहीत अर्हता धारण केली म्हणजे नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार पात्रता धारण न करणारा, गैरवर्तन करताना/ दबावतंत्राचा वापर करताना आढळल्यास त्याची उमेदवारी/ निवड रद्दबातल करण्यात येईल तसेच नियुक्ती झाल्यानंतरही कोणतीही पुर्वसूचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

५.१६ अपात्र ठरलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

५.१७ मनपा सेवेत असताना उमेदवाराच्या चुकीमुळे मनपाचे कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्यास त्याची भरपाई करुन घेणेत येईल.

५.१८ मौखिक मुलाखतीपूर्वी होणा-या कागदपत्रांचे तपासणीचे वेळी शैक्षणिक अर्हता व अनुभव धारण न करणे/अपूर्ण कागदपत्रे सादर करणारे उमेदवारास निवडीसाठी अपात्र ठरविण्यात येईल.

५.१९ उमेदवारांना कागदपत्रे पडताळणीसाठी पात्र उमेदवारांची यादी, निवेदने, निवड व प्रतिक्षा यादी व इतर सूचना हया वेळोवेळी www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील. त्याबाबत उमेदवारांना लेखी पत्रव्यवहार केला जाणार नाही. त्यामुळे उमेदवारांनी भरतीप्रक्रीया पूर्ण होईपर्यंत वेळोवेळी संकेतस्थळावरील सूचना पहाव्यात. संकेतस्थळावरील सूचना पाहिल्या नाहीत या कारणास्तव आलेल्या कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.

५.२० अर्ज करणा-या उमेदवारांनी दि.२१/०३/२०२२ पर्यंत त्या पदाची आवश्यक शैक्षणिक अर्हता, अनुभव धारण करणे आवश्यक आहे.

**६. अर्ज करणेची पध्दत :-**

६.१ अर्ज स्वीकारण्याचा कालावधी दि. १७/०३/२०२२ रोजी सकाळी ९.४५वा. पासून ते दि. २१/०३/२०२२ रोजी सायंकाळी ६.१५ वा.पर्यंत राहील. अर्ज फक्त समक्ष मा.आयुक्त,पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचे नावे, महानगरपालिकेची मुख्य इमारत, चौथा मजला,प्रशासन विभाग येथे स्विकारले जातील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

सही/-
(राजेश पाटील)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

क्रमांक प्रशा/१/कावि/११४ /२०२२
दिनांक -१७/०३/२०२२

(बाळासाहेब खांडेकर)
सहाय्यक आयुक्त (प्रशासन)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका